मराठी विभाग, फॅकल्टी ऑफ आर्ट्स,

**महाराजा सयाजीराव युनिवर्सिटी ऑफ बरोडा**

सायाजीगंज, वडोदरा(गुजरात)

पीएच.डी. नोंदणीसाठी संशोधन प्रस्ताव

*विषय*

**''नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा: एक चिकित्सक अभ्यास''**

**अभ्यासक**

कु. पूर्वा पंडित वस्त

**मार्गदर्शक**

प्रा.डॉ.संजयकुमार करंदीकर

**विषयप्रवेश:**

मराठी साहित्यात त्याच्या प्रारंभापासून आजपर्यंत अनेक स्थित्यंतरे झालेली दिसून येतात. साठोत्तरी मराठी साहित्यात अनेक नवीन प्रवाह उदयास आल्याचे दिसून येते, स्वाभाविकच त्याचे पडसाद गोमंतकीय मराठी साहित्यावरही उमटले. गोमंतकातही प्रादेशिकता, ग्रामीणता, साहित्यातून दृगोच्चर होत होती. पण गोमंतक जरी महाराष्ट्राला जवळचाच प्रदेश असला तरी या छोट्याशा प्रदेशाला वेगळे, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय तसेच ऐतिहासिक परिमाण लाभले आहे. गोमंतकात असलेल्या पोर्तुगीज राजवटीमुळे गोमंतकीय साहित्याची मुक्तीपूर्व व मुक्तीनंतरचे साहित्य अशी विभागणी केली जाते. १६ जानेवारी १९६७ रोजी झालेल्या जनमतकौलामुळे गोमंतकाचे महाराष्ट्रात विलीनीकरण न होता गोमंतक एक स्वतंत्र राज्य घोषित झालं आणि परिणामी गोमंतक प्रदेशाची विशिष्टता टिकवण्यास अधिकची भरही पडली. गोमंतकीय प्रदेशाचा वेगळेपणा, इथली कोंकणी भाषा, निसर्गसौंदर्य, समाज, जातीव्यवस्था, संस्कृती इत्यादीचे चित्रण भिन्न साहित्यप्रकारातून दिसते. कालपरत्वे निर्माण होणाऱ्या समस्या, बदलते समाजजीवन गोमंतकीय साहित्यातून प्रतिबिंबित होताना दिसते. कथा, कादंबरी, कविता, ललित लेख, असे वेगवेगळे प्रकार अगदी समर्थपणे हाताळलेले दिसतात. त्यात कथा या साहित्यप्रकाराने विपुल प्रमाणात गोमंतकीय मराठी साहित्यात भर घातलेली दिसते. अफाट वेगाने होणाऱ्या सामजिक स्थित्यंतरामुळे कथा आशयाच्या अंगानेही समृद्ध होताना दिसते, गोमंतकीय समाज, परंपरा यांचा वेध घेणारी कथा नव्वदोत्तरी टप्प्यात हरवलेली जीवनमूल्ये, आधुनिकीकरण, जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्या, गोमंतकीय पारंपारिकतेला तडा देऊन डोकावणारे अनेक व्यवसाय, अनैतिक गोष्टी, सामाजिकतेचे एक वेगळे वास्तव पुढे आणताना दिसते. नव्वदोत्तरी कथेतील परिवर्तनाचा विचार करताना, बदलत्या समाजजीवनाचा वेध घेऊन, **'नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा: एक चिकित्सक अभ्यास'** या विषयाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न संशोधन प्रबंधामध्ये केला जाईल.

**कथा: संकल्पना व स्वरूप**

कथात्म, नाट्यात्म आणि भावकाव्यात्म असे ललित साहित्याचे तीन प्रमुख वर्ग आहेत. कथात्म साहित्याचे गद्य व पद्य असे माध्यमानुसार दोन वर्ग कल्पिले जातात तसेच स्फुट व दीर्घ असे आकारानुसार वर्गीकरण केले जाते. लिखित स्वरूपातील गद्य कथात्म साहित्यात कथा, दीर्घकथा, लघुकादंबरी, कादंबरी यांचा प्रामुख्याने समावेश होतो. कथनात्मकता आणि निवेदनात्मकता हे कथात्म साहित्याचे व्यवच्छेदक वैशिष्ट्य समीक्षा व्यवहारात मान्यता प्राप्त आहे. कथात्म साहित्यकृती एका विशिष्ट आशयसूत्राच्या संगतीने आकार घेत असते.

कथा ह्या साहित्यप्रकाराचा विचार करता, कथेचे विशिष्ट असे गुणधर्म समजून घेणे अपेक्षित आहे. कल्पित वास्तवातील घटनामालिकेचे निवेदन कथात्म साहित्यकृतीत केले जाते. कथेतील घटना पात्रांवर संस्कार करीत

असतात तसेच पात्रेदेखील घटनांना आकार देत असतात. घटना व पात्रे अशा प्रकारे परस्परांना घडवीत कथानकाची उभारणी केली जाते. कथेतील घटनाप्रवाहामागे निवेदकपात्र, कथाविश्वाची निर्मिती करणारा लेखक, त्याची कलादृष्टी, जीवनदृष्टी, मूल्यविचार यात असणाऱ्या क्रियाशीलतेतून घटनाप्रसंग, भाषिक, स्थलकालादी तपशिलांच्या निवडीतून कथानक आकार घेत असते. पात्र या घटकालाही काही मीमांसक प्राधान्य देताना दिसतात. त्यात ना. सी. फडके यांची भूमिका महत्त्वाची ठरते. त्यांच्या मते, "कथारचनेपेक्षा व्यक्तिदर्शन हेच ललित कथेचे अधिक महत्त्वाचे अंग आहे"[१], कथानकातून व्यक्ती निर्माण होत नाहीत तर व्यक्तींतून कथानक निर्माण होत जाते. पात्र हा कथात्म साहित्यकृतीतील महत्त्वाचा मूलघटक. कथात्म साहित्यात घटना, पात्रे या घटकांबरोबर स्थलकालबद्द वातावरण हेही कल्पित कथाविश्वाचे मूल घटक असते. पात्रे जिथे जगतात, जिथे घटना घडतात तो प्रदेश, स्थळे, काळाचा अवकाश या सर्वांच्या निर्मितीतून एक सलग असे वास्तव दर्शन लेखक घडवीत असतो. कथात्म वास्तव हे कोणत्याही स्वरूपाचे असले तरी लेखकाने शब्दार्थांतून उभारलेले एक कल्पित असते. यात कथा सांगणारा म्हणजेच कथा निवेदकही महत्त्वाचा ठरतो. कथात्म साहित्यात निवेदनाच्या प्रथमपुरुषी व तृतीयपुरुषी पद्धती असे भाग कल्पिलेले आपल्याला दिसतात. विविध घटकांचे संघटन करण्याचे कार्य निवेदक करत असतो. कथेच्या निवेदकामागे एक गर्भित लेखक असतो, असा विचारही मांडण्यात येतो. हा लेखकाचा दुसरा 'स्व' असतो जो कथात्म साहित्यातील संहितेबरोबर आकार घेत असतो. कथेच्या निवेदनात कथात्म अवकाशातील वातावरण, स्थलप्रदेश इत्यादी वर्णने येतात, निवेदक पात्र प्रसंगाचे चित्रणही करत असतो, तसेच मानवी जीवनासंबंधी तत्वविचारांवर भाष्य ही करताना दिसतो. कथन, वर्णन व भाष्याबरोबर संवादही महत्त्वाचा निवेदनप्रकार आहे. संवादातून पात्रनिर्मिती हे महत्त्वाचे कार्य घडत असते. पात्रांचे स्वभावविशेष, त्यांची विचारप्रणाली, संस्कृती इत्यादी गोष्टी संवादातून प्रकट होताना दिसतात. आशयसूत्र, कथानक, पात्र, वातावरण, निवेदन, भाषा असे घटक मिळून कथा हा साहित्यप्रकार आकार घेत असतो.

**नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा**

गोमंतकीय कथेचा विचार करत असताना आपल्याला अगदी मौखिक परंपरेतल्या लोककथांचा उल्लेख करावा लागतो. गोमंतकाला लोककथेची मौखिक परंपरा लाभली आहे. गोवामुक्तीपूर्व आणि मुक्तीनंतरच्या काळातही गोमंतकीय कथेमध्ये विपुल प्रमाणात भर पडलेली आहे. या कथेतून व्यक्त होणारी प्रदेशनिष्ठा, लोकसंस्कृती, गोमंतकीय समाज व त्यांच्या समस्या यांचे विपुल प्रमाणात दर्शन घडताना दिसते.

वैशिष्ट्यपूर्ण अशी गोमंतकीय मराठी कथा मराठी कथेहून वेगळी ठरते. कथेतून येणारे विषय गोमंत प्रदेशनिष्ठा व्यक्त कारताना दिसतात तसेच गोमंत लोकसंस्कृतीची पार्श्वभूमी या कथांना लाभलेली दिसते. "नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा ही समकालीन मराठी कथेला समांतर अशी आहे" [२] असे मत प्रा. विनय बापट यांनी नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा या आपल्या शोधनिबंधातून मांडलेले आहे. गोमंतकीय मराठी कथेचे समीक्षक डॉ. बाळकृष्ण कानोलकर यांनी पाच टप्पे मांडलेले आहेत. १) मध्ययुगीन मराठी कथा, २) १९१० ते १९२५, ३) १९२६ ते १९३०, ४) १९३० ते १९४५, ५) १९४६ ते १९६१, पुढील काळाचे १९६२ ते १९७५, १९७६ ते १९९० आणि १९९० व त्यानंतर असे टप्पे मांडले गेले आहेत.

गोमंतकीय प्रादेशिक कथेची सुरवात १९३१ साली वि. स. सुखठणकर यांच्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या कथासंग्रहातून झाली, तेव्हापासून गोमंतकीय मराठी कथेचे दालन समृद्ध होत गेले. सुखठणकरांचा प्रादेशिकतेचा वारसा नंतरच्या पिढीतील प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई, व्यंकटेश पै रायकर, पंडित महादेवशास्त्री जोशी, बा. भ.

बोरकर, बा. द. सातोस्कर इत्यादी कथाकारांनी पुढे नेला. १९८० च्या दरम्यान लोकप्रिय कथाकार म्हणून सुभाष भेंडे, कथेला विज्ञानाची जोड देणारे डॉ. अरुण हेबळेकर, नरेश कवडी, प्रा. मनोहर हि. सरदेसाई, स. श. देसाई, डॉ. प्रल्हाद वडेर, पु. शी. नार्वेकर, गजानन रायकर इ. उल्लेख केला जातो. त्याचबरोबर नव्वदोत्तरी कालखंडात महत्त्वाचे लेखक म्हणून विठ्ठल गांवस, चंद्रकांत गांवस, डॉ. विठ्ठल ठाकूर, नारायण महाले, दासू शिरोडकर, अवधूत कुडतरकर, डॉ. सु. म. तडकोड, जयराम कामत, ज्ञानेश्वर कोलवेकर, मिलिंद म्हामल, गजानन देसाई, मोरेश्वर मराठे, अशोक घाडी, ना. बा. रणसिंग, उदय नाईक यांच्या कथालेखनाबरोबर माधवी देसाई, वासंती नाडकर्णी, अंजली अमोणकर, मीनल तळावलीकर, रेखा मिरजकर, रेखा पौडवाल, सुजाता सिंगबाळ, गीरिजा मुरगोडी, लीना पेडणेकर, मंगला साने, मीना समुद्र, डॉ. किशोरी पै, ज्योती कुंकळकर, मेघना कुरुंदवाडकर, डॉ. आरती दिनकर या लेखिकांचे योगदानही महत्त्वाचे ठरते.

१९९६ सालात प्रकाशित झालेल्या 'भार' या डॉ. विठ्ठल ठाकूर यांच्या कथेतून अद्भुतरम्यता, रहस्यमयता आढळते, त्याचबरोबर प्रादेशिकताही दिसून येते. जयराम कामत यांचे 'अंधारयात्री', 'क्रांतीदूत' व 'सुखिया' हे महत्त्वाचे कथासंग्रह. त्यांची कथा गोमंतकीय जीवनातील विविध पैलूंना स्पर्श करते. गोव्याचा निसर्ग, जनजीवन, माणसे, याचं चित्रण आपल्या कथेतून करणाऱ्या लेखकांपैकी एक गजानन रायकर. पोर्तुगीजकालीन समाजजीवनही त्यांची कथा टिपतान दिसते. गोमंतकीय प्रदेश, ग्रामीण जीवन, शेताभाटात राबणारा कष्टकरी समाज, त्यांच्या जीवनातील विविध घटना प्रसंग यांचे चित्रण नारायण महाले यांची कथा करताना दिसते. 'अस्तित्व', 'होमकांड', 'होरावणी', 'रागावणी' हे त्यांचे महत्त्वाचे कथासंग्रह. विठ्ठल गांवस हे नव्वदोत्तरी कालखंडातील महत्त्वाचे लेखक. त्यांचे कॅथरीन(१९९४), लवण(२००३), ओझं(२०१०), हे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या 'लवण' या कथासंग्रहात 'लवण' ही कथा येते. मिठागरात कष्ट करून आपली उपजीविका चालवण्यासाठी आपला पारंपारिक व्यवसाय जपणाऱ्या दादूची कथा येते. ग्रामीण लोकजीवन अभिव्यक्त करणारी त्यांची कथा आहे. गोमंतकीय प्रादेशिक वैशिष्टेही त्यांच्या कथेला लाभलेली आहेत. ज्ञानेश्वर कोलवेकर यांच्या कथा मानवी जीवनजाणिवांचे सूक्ष्म आकलन करत, त्यांच्या अशा-आकांक्षा, विषयवासना, अहंभाव, विकृती यांचे चित्रण करतात. त्यांच्या 'भोलानाथ' या कथासंग्रहातील 'सायबिणी पाव' या कथेत पर्यटनामुळे गोव्याच्या जनजीवनावर झालेल्या दुष्परिणामांचे प्रभावी चित्रण येते. मिलिंद म्हामल यांचे चतुर्थी(२००५), आलकाण्याचा डोंगर(२००८) हे कथासंग्रह महत्त्वाचे ठरतात. यात आलेली 'लेनिनग्राड' ही कथा पर्यटनामुळे समाजाची ढासळलेली मूल्यव्यवस्था दृष्टीक्षेपात आणते. स्वत:ची जमीन रशियन पर्यटकाला विकून तिथे वेश्याव्यवसाय, कोको शॅक्स, ड्रग्स या अनैतिक गोष्टींचं समर्थन करणारा धनंजय शेवटी एड्सच्या विळख्यात सापडतो अशी कथा येते. गोव्यातील सर्वसामान्य माणसाचं जगणं, ग्रामीण जनजीवन व कालानुरूप होणाऱ्या सामाजिक बदलांमुळे ढासळलेली मूल्यव्यवस्था इत्यादींचं चित्रण त्यांची कथा करते. 'कुळागर' या आपल्या पहिल्या कथासंग्रहातून प्रादेशिक कथेमध्ये भर घालणारे लेखक म्हणून गजानन देसाई यांचा उल्लेख केला जातो. मोरेश्वर मराठे यांच्या 'नशा' या कथासंग्रहातील काही कथांमधून ख्रिस्ती कुटुंबाचे, व्यक्तींचे चित्रण आढळते. त्यात 'निस्संग' या कथेतून पती परदेशी गेल्याने व शेवटी मुलेही सोबत नसल्याने एमिलीला एकांतपणा सतावतो. पूर्वायुष्यातल्या आठवणीत रमत निरफणसाच्या झाडाबरोबर ती बोलत राहते. उदय नाईक यांचा 'अवसर' हा कथासंग्रह गोमंतकीय मराठी कथेत महत्त्वाची भर घालतो. गोव्यातील काणकोणच्या परिसरातील श्रध्दा, परंपरा, उत्सव, समजुती, व्यक्ती, इत्यादींचे प्रभावी चित्रण त्यांची कथा करते. सु. म. तडकोड यांचा 'डोळ्यातील जग' हा कथासंग्रह महत्त्वाचा ठरतो, अस्तित्ववादी विचारांच्या त्यांच्या कथा, पारंपारिक कथा लेखनाच्या तंत्रालाही वेगळे

वळण देणाऱ्या ठरतात. गोमंत समाजजीवनाच्या वर्तुळात विजय कापडी विनोदी कथा लेखन करताना दिसतात. 'पाच बायकांचा दादला', 'छत्रितली अनामिका' हे त्यांचे महत्त्वाचे कथासंग्रह,

नव्वदोत्तरी स्त्री लेखिकाही महत्त्वाच्या ठरतात. त्यात रेखा मिरजकर यांचे 'पाउलखुणा' व 'पांगरा' असे दोन काथासंग्रह प्रकाशित झाले. मुलं परदेशी गेल्याने मुलाच्या प्रेमासाठी आसुसलेल्या स्त्रीचे चित्रण 'पांगरा' या कथेतून आलेले आहे. सुजाता सिंगबाळ यांच्या 'स्नेहबंध' या १९९९ साली प्रकाशित झालेल्या कथासंग्रहातील 'गंध मातीचा' या कथेतून गोव्याबाहेर राहणाऱ्या गोमंतकीय मनाला लागलेली मातीची ओढ चित्रित केली आहे. त्यांच्या 'गारठलेल्या वाटा' या कथेतून ख्रिश्चन कुटुंबात दिसणारी शोकांतिका व्यक्त केली आहे. आधुनिक जीवनपद्धती व पर्यटनाचे दुष्परिणाम या कथेतून येताना दिसतात. वासंती नाडकर्णींच्या कथा मानवी नातेसंबंधाचा शोध घेताना दिसतात. स्त्री दुख:, वेदना मांडताना त्यांची कथा दिसते. नव्याने निर्माण झालेले स्त्रीप्रश्न डॉ. आरती दिनकर, रेखा पौडवाल यांच्या कथेतून येताना दिसतात. गीरिजा मुरगोडी यांच्या कथेतून दैनंदिन विषय येताना दिसतात. प्रा. विनय बापट यांच्या मते, "पुरुषांच्या कथालेखनाला जो मातीचा सुगंध जाणवतो तो स्त्री लेखिकांच्या लेखनात जाणवत नाही"[३]. पण नातेसंबंधात जागतिकीकरणामुळे चाललेली ओढताण अनेक लेखिकांच्या कथेमधून दिसून येते.

नव्वोदत्तरी गोमंतकीय कथेत प्रादेशिकता, ग्रामीणता दिसून येते तसेच बदलत्या समाजाबरोबर ढासळलेली समाजमूल्येही दिसून येतात व गोमंतकीय कथा वास्तववादी भुमिक स्वीकारते. जागतिकीकरण व गोमंतकीय अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या प्रयत्नात समाज, संस्कृती यावर पडसाद उमटतात. पर्यटन, आधुनिकीकरण इत्यादींचा प्रभाव गोमंतकीय कथेवर दिसतो.

**विषय निवडी मागील भूमिका:**

गोमंतकीय मराठी कथा बदलत्या समाजाबरोबर वेगवेगळी वळणे घेताना दिसते. आधुनिकीकरण व जागतिकीकरणाने निर्माण होणाऱ्या समस्या मांडताना दिसते, त्याच बरोबर निसटू पाहणाऱ्या प्रादेशिकतेचे हातही पकडताना दिसते. ही कथा हरवलेल्या जीवनजाणीवा व्यक्त करते, ढासळणाऱ्या मूल्यांचे अवलोकन करते. मध्यमवर्गीय गोमंतकीय स्त्रीच्या भावनांचा वेध घेते. ही कथा बदलत्या जीवनजाणीवा व सामाजिक प्रश्नांविरुद्ध बंड पुकारत नाही, ती संथपणे व्यक्त होत राहते. वाचकालाही या बदलांची जाणीव करून देते. गोमंतकाच्या मुक्तीपूर्व व मुक्तीनंतरच्या कथांचा, प्रामुख्याने १९९० पूर्व कथांचा अभ्यास झालेला दिसतो. नवकथेला समांतर जाणारी मनोविश्लेषणात्मक कथा, कथेतील प्रादेशिकता, समाज, रूढी परंपरा इ. विषय समाविष्ट करणाऱ्या कथांचा अभ्यास गोमंतकीय समीक्षकांनी केलेला दिसतो. पण नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचा (काही अपवाद वगळता) फारसा अभ्यास झालेला आपल्याला दिसत नाही. आशय विषयाची मांडणी व तंत्राच्या अनुषंगाने नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेचा अभ्यास झालेला दिसत नाही. म्हणून एकोणीसशे नव्वद नंतर प्रकाशित झालेल्या प्रातिनिधिक गोमंतकीय कथांकारांच्या कथेचा अभ्यास व्हावा, अशी या विषय निवडी मागची भूमिका आहे.

**संशोधनाचे ध्येय व उद्दिष्टे**

1. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेची सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पार्श्वभूमी स्पष्ट करून नव्वदोत्तरी कथा लेखनाचा आढावा घेणे.

2. आधुनिकीकरण, जागतिकीकरणाचे नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेवर उमटलेल्या पडसादाचा अभ्यास करणे.
3. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतून येणारी ग्रामीणता व प्रादेशिकतेचा अभ्यास करून, प्रादेशिकता व ग्रामीणतेचे बदलते स्वरूप स्पष्ट करणे.
4. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचे वाङ्मयीन मूल्यमापन करणे.
5. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेवर असलेला मराठी कथेचा प्रभाव स्पष्ट करून. गोमंतकीय मराठी कथेचा वेगळेपणा स्पष्ट करणे.

**संशोधनाची व्याप्ती**

प्रस्तुत संशोधनात नव्वदोत्तरी टप्प्यातल्या, तीन दशकातील म्हणजेच १९९० ते २०२० या कालखंडातील काही निवडक कथाकारांचा सखोल अभ्यास केला जाईल. आधुनिकिकरण, जागतिकीकरणाचा प्रभाव व्यक्त करणारी, तसेच प्रादेशिकता व ग्रामिणजीवानातील सद्यस्थिती व्यक्त करणाऱ्या कथा निवडल्या जाणार आहेत. गोमंतकीय निवडक स्त्री कथालेखिकेंच्या कथाही निवडल्या जाणार आहेत. त्यात नव्वदोत्तरी कालखंडात महत्त्वाचे लेखक म्हणून विठ्ठल गांवस, चंद्रकांत गांवस, डॉ. विठ्ठल ठाकूर, नारायण महाले, डॉ. सु. म. तडकोड, जयराम कामत, ज्ञानेश्वर कोलवेकर, मिलिंद म्हमल, गजानन देसाई, उदय नाईक, मोरेश्वर मराठे, गजानन रायकर यांच्या कथालेखनाबरोबर माधवी देसाई, वासंती नाडकर्णी, अंजली अमोणकर, डॉ. आरती दिनकर, रेखा मिरजकर, रेखा पौडवाल, सुजाता सिंगबाळ, गीरिजा मुरगोडी, लीना पेडणेकर, मंगला साने, मीना समुद्र, मेघना कुरुंदवाडकर, या स्त्रीलेखिकांचा विचारही ह्या अभ्यासांतर्गत केला जाईल.

**संशोधनाची मर्यादा**

नव्वदोत्तरी कथालेखनात विपुल प्रमाणात भर पडलेली आहे. पण सातत्याने व प्रभावीपणे लेखन करणारे निवडक कथाकार या अभ्यासाचे विषय असणार आहेत. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी साहित्यात योगदान दिलेल्या सर्वच कथाकारांचा अभ्यास केला जाणार नाही. वरील उल्लेखिलेल्या निवडक कथाकारांच्या कथालेखनाचा अभ्यास केला जाईल. दिवाळी अंक आणि वृत्तपत्रांवर प्रसिद्ध होणाऱ्या कथा लेखनचा विचार केला जाणार नाही. प्रकशित कथासंग्रहांचा प्रामुख्याने अभ्यास केला जाईल.

**संशोधनपूर्व संशोधन: एक पाहणी**

गोमंतकीय मराठी कथेचा अभ्यास झालेला असला तरी नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचा अभ्यास झालेला दिसत नाही. १९९० ते २००० या दशकातील सुरवातीच्या पाच सहा वर्षातील कथालेखकांचा उल्लेख गोमंतकीय वाङ्मय इतिहासात आढळतो. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २ मधून, मुक्तीनंतरचा कालखंड व महत्त्वाच्या कथाकारांचा आढावा प्रा. नारायण महाले घेताना दिसतात. तसेच प्रा. विनय बापट यांनी नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेवर व प्रा. प्रमदा गावस देसाई यांनी नव्वदोत्तरी गोमंतकीय प्रादेशिक कथेवर शोधनिबंध लिहिलेले दिसून येतात. त्याचप्रमाणे सुनेत्रा नार्वेकर यांनी अरुण हेबळेकरांच्या कथात्म साहित्याचा

अभ्यास करत असतांना हेबळेकरांच्या कथेचा समावेश आपल्या अभ्यासांतर्गत केलेला आहे. 'गोमंतकीय कथा-कादंबरी लेखनातील स्त्री व्यक्तिरेखा एक पर्यालोचन' या विषयांतर्गत प्रा. वृंदा केळकर यांनी पं. महादेवशास्त्री जोशी, लक्ष्मणराव सरदेसाई, मनोहर हिरबा सरदेसाई यांच्या कथांचा अभ्यास केलेला आहे. कौटुंबिक, सामाजिक, राजकीय विषयांना समाविष्ट करणाऱ्या या कथा आहेत.

डॉ. बालकृष्णाजी कानोळकर हे गोमंतकीय मराठी कथेचे महत्त्वाचे समीक्षक. डॉ. बाळकृष्णाजी कानोळकर यांनी गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास (आरंभ ते १९६१) खंड १ मध्ये आरंभापासून १९६१ पर्यंतच्या मुक्तीपूर्व कथांचा व कथालेखकांचा आढावा घेवून गोमंतकीय मराठी कथेच्या इतिहास लेखनामध्ये महत्त्वाची भर घातली. तत्कालीन सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी मांडून त्यांनी समीक्षात्मक दृष्टीने हा ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे. त्याचप्रमाणे डॉ. कानोळकरांनी पीएच.डी. च्या अभ्यासासाठी प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या व्यापक कथाविश्वाचा तितक्याच व्यापकतेने अभ्यास करून गोमंतकीय मराठी कथा संशोधनामध्ये महत्त्वाची भर घातलेली दिसते. त्यांनी गोमंतक तसेच मराठी साहित्यातील काही महत्त्वाच्या कथालेखकांवर सातत्याने संशोधनपर लेख लिहून कथेच्या समीक्षेचा व्याप समर्थपणे हाताळलेला दिसतो. तसेच डॉ. सोमनाथ कोमरपंथ, डॉ. सु.म.तडकोडकर, डॉ. वासुदेव सावंत इ. समीक्षक व अभ्यासकांनी अनेक मासिकातून गोमंतकीय कथेवर समीक्षात्मक लेख लिहिलेले आपल्याला दिसून येतात. १९९० नंतरच्या कालखंडातील प्रामुख्याने २००० ते २०२० या दोन दशकातील कथेवर समीक्षात्मक व संशोधनात्मक अभ्यास न झाल्याने, १९९० नंतरच्या कथालेखांच्या संशोधनाची गरज भासते.

**संशोधनाची कार्यपद्धती व तंत्रे**

१. कथांचा अभ्यास करताना विश्लेषणात्मक, ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करून नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचा प्रवाह स्पष्ट करण्यात येईल.
२. तौलनिक साहित्याभ्यासाच्या पद्धतीचा अवलंब करून नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेचे बदलते स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला जाईल.
३. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेच्या रुपबंधाचा अभ्यास करण्यात येईल.

**गृहीतके**

१. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेमध्ये जागतिकीकरणाचे तसेच आधुनिकीकरणाचे पडसाद उमटलेले दिसतात.
२. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून येणारी प्रादेशिकता, १९९० पूर्व कथेतल्या प्रादेशिकतेच्या तुलनेत कमी प्रमाणात दिसते.
३. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा ग्रामीण जीवन व ग्रामीण जीवनाशी निगडीत प्रश्न मांडणारी आहे.
४. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा स्त्रीलेखिका ग्रामीण स्त्री व तिच्या समस्या याचा जास्त विचार करत नाही.
५. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेच्या रूपबंधामध्ये उणीवा दिसून येतात.

६. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा व एकंदरीत मराठी कथा समांतर जाणारी आहे.

**प्रकरणांची मांडणी**

| **अ.क्र.** | **प्रकरण** | **विषय** |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | - |
| २. | प्र. पहिले | कथा: संकल्पना, स्वरूप, व्याप्ती |
| ३. | प्र. दुसरे | १९९० पूर्व गोमंतकीय मराठी कथा |
| ४. | प्र. तिसरे | नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा |
| ५. | प्र. चौथे | नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील ग्रामीणता व प्रादेशिकता |
| ६. | प्र. पाचवे | नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून येणारी खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण |
| ७. | प्र. सहावे | नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून येणारी पात्रचित्रणे |
| ८. | प्र. सातवे | नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचे वाङ्मयीन मूल्यमापन |
| ९. | प्र. आठवे | मराठी कथेचा गोमंतकीय कथेवर असलेला प्रभाव |
| १०. | प्र. नववे | निष्कर्ष |
| ११. | परिशिष्ट | |

**समारोप**

प्रस्तुत संशोधन प्रस्तावात दिलेल्या प्रकरणांच्या संभाव्य मांडणीनुसार, पहिल्या प्रकरणात कथा या साहित्यप्रकाराची संकल्पना स्पष्ट करून, कथेचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट केली जाईल. दुसऱ्या प्रकरणामध्ये एकंदरीत नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचा आढावा घेतला जाईल. तिसऱ्या प्रकरणात नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून येणाऱ्या प्रादेशिकता व ग्रामीणतेच अभ्यास केला जाईल. चौथ्या प्रकरणात नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून येणारे विषयनाविन्य खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या अनुषंगाने अभ्यासले जाईल. पाचव्या प्रकरणातून गोमंतकीय मराठी केथेतून येणाऱ्या पात्रांचा अभ्यास केला जाईल. सहाव्या प्रकरणात नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचे वाङ्मयीन मूल्यमापन करत रूपवैशिष्ट्यांचा अभ्यास केला जाईल, आणि आठव्या प्रकरणात नव्वदोत्तरी मराठी कथेचा नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेवर असलेला प्रभाव याचा तुलनात्म दृष्ट्या अभ्यास केला जाईल. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचा अभ्यास करत असताना वेगवेगळ्या संशोधन पद्ध्तींचा अवलंब करणार आहे. वरील प्रकरणांचा सखोल अभ्यास करून शेवटी निष्कर्ष मांडले जाणार आहेत.

**संदर्भग्रंथ:**


1. कथा: संकल्पना आणि समीक्षा, सुधा जोशी, मौज प्रकाशन गृह, फेब्रुवारी २०००, पृ. क्र. – ४.
2. नव्वदोत्तरी मराठी कथा: रंग आणि अंतरंग (डॉ. रा. गो. चवरे गौरवग्रंथ), संपा. गजानन हेरोळे, औरंगाबाद: गोदा प्रकाशन, २०१८, पृ. क्र. – २१.
3. तत्रैव. पृ. क्र. – ३१.
4. मराठी कथा: १९४०-२००० एक परामर्श, सुधा जोशी, मुंबई: मॅजेस्टिक पब्लिशिंग हाउस, २०१९.
5. मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड ७).
6. मराठी कथा प्रवृत्ती आणि प्रवाह : रा. गो. चवरे.
7. मराठी कथा: परंपरा आणि नवता : अक्षर यात्रा, २०१०-२०११, मराठी साहित्य महामंडळ.
8. प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांची कथा : एक शोध, डॉ. बाळकृष्ण कानोळकर, गोमंतक मराठी अकादमी, मार्च २००५.
9. लघुकथा लेखन : मंत्र आणि तंत्र, ना. सी. फडके, व्हीनस प्रकाशन : पुणे. ऑगस्ट १९५२.
10. वैदर्भीय ग्रामीण कथात्म साहित्य : रूप आणि स्वरूप (सन् १९४५-१९९५), डॉ. सौ. वर्ष चिखले, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, मार्च २०१३.
11. निवडक कथा : स्वरूप व समीक्षा, प्रा. डॉ. फुला बागुल, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, ऑगस्ट २०१३.
12. मराठीतील कथारूपे : प्रा. रा. ग. जाधव, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाउस पुणे, नोव्हेंबर १९९९.
13. मराठी लघुकथेचा इतिहास (इ. स. १८९० ते १९६०) : प्रा. म. ना. अदवंत, नीहार प्रकाशन, ५ एप्रिल १९९३.
14. मराठीतील काही कथाकार (१८९० ते १९४० या कालखंडातील काही कथाकारांच्या कथांचा अभ्यास), म. ना. अदवंत, अनमोल प्रकाशन, पुणे १९७०.
15. मराठवाड्यातील दलित कथा, एकनाथ आबूज प्रा. गौतम गायकवाड.
16. मराठी कथा : रूप आणि परिसर – म. द. हातकणंगलेकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
17. स्वातंत्र्योत्तर मराठी ग्रामीण कथा आणि स्त्री – डॉ. सौ. कल्पना बोरकर, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, २०१५.
18. १९८० नंतरचे स्त्री निर्मित कथनपर साहित्य, सं. पुष्पलता राजपुरे – तापस, शब्दालय प्रकाशन, डिसेंबर २०१०.
19. १९९० पूर्वीची गोमंतकीय मराठी कादंबरी (एक चिकित्सक अभ्यास) - (प्रबंध) – डॉ. विद्या प्रभुदेसाई, जुलै १९९९.
20. पंडित महादेवशास्त्री जोशी यांचे कथाविश्व - (प्रबंध), अर्चना पंडित, एप्रिल १९९९.
21. गोमंतकीय कथा कादंबरी लेखनातील स्त्री व्यक्तिरेखा : एक पर्यालोचन- (प्रबंध), वृंदा माधव केळकर, मे २०१०.
22. राजन गवस यांचे कथात्म साहित्य : एक चिकित्सक अभ्यास - (प्रबंध), गोविंद काजरेकर, २००८.
23. अरुण हेबलेकर यांचे कथात्म साहित्य : एक चिकित्सक अभ्यास - (प्रबंध), सुनेत्रा पुंडलिक नार्वेकर, मार्च २०१९.

24. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपा. डॉ. वि. भा. प्रभुदेसाई, प्रा. रवींद्र घवी, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, २००३.
25. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दोन (मुक्तीनंतरचा कालखंड), संपा. प्रा. एस्. एस्. नाडकर्णी व डॉ. सोमनाथ कोमरपंत, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन. २००३.
26. गोमंतकीय ग्रंथकारांच्या मराठी ग्रंथांची ग्रंथसूची (आरंभ ते २०१२), मिलिंद म्हामल, राजभाषा संचालनालय, पणजी गोवा. २०१४.
27. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध : डॉ. नागनाथ कोतापल्ले, स्वरूप प्रकाशन.
28. जागतिकीकरण व ग्रामीण साहित्य : डॉ. प्रविण बनसोड, प्रा. शांतरक्षित गावंडे.
29. मराठी वाङ्मय प्रकार : स्वरूप, संकल्पना व वाटचाल, संपा. डॉ. द. के. गंधारे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जानेवारी २०१७.